MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

● वर्ष : २० अंक : १ पाने : ८ ● डिसेंबर २०२४-जानेवारी २०२५ www.mahatransco.in ● Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी व चांगल्या प्रगतीसाठी ऊर्जा हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. देशाची एकूण प्रगती ही ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीशी संलग्नित असते. ऊर्जा क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य सातत्याने प्रगतीच्या दिशेने चालले आहे. यामध्ये महापारेषण, महावितरण, महानिर्मिती आणि मेडा यांचाही मोठा वाटा आहे, हे नाकारून चालणार नाही.

महापारेषण यंत्रणेचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी महावितरण व महानिर्मिती तसेच इतर वीजनिर्मिती व वीज वितरण कंपन्यांशी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे ठरते. त्यासाठी आवश्यक पुढाकार घेणे हे महापारेषणमधील प्रत्येक

- **भविष्यात विजेची मागणी वाढणार**
- **यंत्रणेचे सक्षमीकरण गरजेचे**
- **कामे गतीने करा**
- **सांघिक भावनेने काम करा**

विभागाचे व अधिकाऱ्यांचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. त्यामध्ये कोणतीही उणीव आपण ठेवणार नाहीत, याचा मला विश्वास आहे.

कंपनीच्या कामाचा आढावा घेताना मी पाहतो की, बऱ्याच ठिकाणी कामाची गती वाढविण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी दिलेल्या निर्देशांचे पालन अधिकारी करताना दिसत नाहीत. त्यामुळे काही ठिकाणी कामे प्रलंबित दिसून आहेत. त्याबाबतच्या अडचणी वरिष्ठांना वेळेत निदर्शनास न आणल्यामुळे जेव्हा मुख्य कार्यालय आढावा घेते, त्यावेळी त्या अडचणी उपस्थित केल्या जातात. त्यामुळे एकंदरीत आढावा व नियंत्रणाबाबत क्षेत्रीय पातळीवर दक्ष राहायला हवे.

माझी अशी धारणा आहे की, कोणत्याही अडचणींवर सांघिक प्रयत्नांनी (Team Efforts) मात करता येऊ शकते. नियंत्रण अधिकारी (Controlling Officer) आपल्या स्तरावर आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य नियंत्रण ठेवतील, अशी मला आशा आहे. कामाचा तत्पर आढावा व नियंत्रण हेच यशाचे गमक असते.

कंपनीचे यश हे त्यामधील कर्मचारी आपापसात कशा पध्दतीने संवाद (Internal Communication) साधतात व एकत्रित कार्य हाताळतात, यावर अवलंबून असते. सांघिक कार्य हे कंपनीच्या दैनंदिन कामकाजाचा महत्त्वाचा भाग आहे. त्याचा फायदा हा काम करण्यासाठी आवश्यक ती प्रेरणा निर्माण करण्यात होतो. त्यामुळे कामाप्रती निष्ठा व आदर तयार होऊन कार्य उत्तमरित्या पूर्ण करता येते. सांघिक कामगिरीमुळे कठीण कामही पूर्णत्वास नेणे, सहज शक्य होते. अशाच सांघिक कार्याचा अंतर्भाव करण्यात आपण मागे पडता कामा नये. नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व त्यासाठी प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याकरिता केलेले प्रयत्न हे नेहमीच कंपनीच्या यशस्वी वाटचालीकरिता फायद्याचे ठरते.

मानव संसाधन विभाग कर्मचाऱ्यांना अशा नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी प्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देत असते. कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा चांगल्या पध्दतीने फायदा घेतला पाहिजे व प्रत्येकाने कंपनीच्या वाढीमध्ये आपला हातभार लावला पाहिजे.

महापारेषण-२०२४ च्या दैनंदिनी व दिनदर्शिकेला पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने सर्वोत्कृष्ट तीन पुरस्कार मिळाले. तसेच पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲन्ड पीआर व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. यावर्षी महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने कंपनीचा स्वतंत्र https://mahatransco.blogspot.com/ ब्लॉग सुरु केला आहे. त्या ब्लॉगच्या माध्यमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये अंतर्गत संवाद (Internal Communication) वाढीस लागेल.

नोकरभरतीच्या जाहिराती व अपडेट माहितीसाठी https://www.linkedin.com/in/maha-transco/ हा लिंक्डइन प्लॅटफॉर्मही सुरु केला आहे. वेबसाईटसह एक्स, फेसबुक, इन्स्टाग्राम, थ्रेडस, युट्यूब, टेलिग्राम चॅनेलसह सर्वाधिक सोशल मीडियावर असणारी महापारेषण ही पहिली कंपनी ठरली आहे. महापारेषणचा स्वतंत्र पॉडकास्ट चॅनेलही लवकरच सुरु होणार आहे, ही खरंच कौतुकाची व अभिनंदनीय बाब आहे.

विजेच्या उपलब्धतेनुसार पुरवठा व त्याचे नियंत्रण करण्यासाठी नाविन्यपूर्ण योजनांची यशस्वी



**डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

अंमलबजावणी केल्याबददल महापारेषणच्या महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीला देशातील सर्वोत्कृष्ट भार प्रेषण केंद्र व ओपन ॲक्सेस (एसएलडीसी) या दोन राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले. महापारेषण कंपनीला अग्रेसर ठेवण्यासाठी आपल्या विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने सर्जनशील (Creativity) व नाविन्यपूर्ण (Innovations) उपक्रम राबविले पाहिजेत.

नेतृत्वगुणांचा वापर हा आपल्या सहकर्मचा-यांना प्रेरित करण्यासाठी करुन त्यांना सक्रियतेने संघटन बांधण्यासाठी केला पाहिजे. सर्व विभागप्रमुख व प्रत्येक छोटया-छोटया विभागाचे प्रमुख आपल्या नेतृत्वाने एक चांगला मार्ग आपल्या सहकर्मचाऱ्यांना दाखवतील, असा मला विश्वास आहे.सुयोग्य व्यवस्थापन, चांगले नेतृत्व, कामाची सुयोग्य विभागणी, नियमित देखरेख, कामाप्रती निष्ठा अशा सर्वगुणांचा एकत्रित अंतर्भाव करुन प्रत्येक जण कंपनीच्या यशस्वी वाटचालीत आपले योगदान देतील, याची मला खात्री आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**मुंबई :** महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी, प्लॅनर-२०२५ चे प्रकाशन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, शेजारी संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, श्री. मंगेश शिंदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी

### ▶ वरिष्ठ अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी व प्लॅनर-२०२५ चे थाटात प्रकाशन

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वार्षिक दैनंदिनी, प्लॅनर-२०२४ व सेवाभरती विनियम पुस्तकाचे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. किशोर गरुड, श्री. भूषण बल्लाळ, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमुख्य सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी श्री. किशोर पाटील, श्री. प्रशांत गोरडे, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. संजीवकुमार बद्देला, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्री. संदीप धाबर्डे, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, श्रीमती रेणुका नाटके उपस्थित होते.

याप्रसंगी महापारेषण कंपनीच्या ब्लॉग व लिंक्डइन या सोशल मीडियाचे अनावरणही डॉ. संजीव कुमार यांनी केले. याप्रसंगी विनाअपघात सेवा बजावल्याबद्दल श्री. संजय भगत व श्री. कमलेश यादव यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी केले.



**मुंबई :** महापारेषणच्या सेवाभरती विनियम पुस्तकाचे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. किशोर गरुड, श्री. भूषण बल्लाळ, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव.

## महापारेषणचा जनसंपर्क विभाग आघाडीवर

महापारेषण-२०२४ च्या दैनंदिनी व दिनदर्शिकेला पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने सर्वोत्कृष्ट तीन पुरस्कार मिळाले. तसेच पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲन्ड पीआर व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. यावर्षी महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने कंपनीचा स्वतंत्र https://mahatransco.blogspot.com/ ब्लॉग सुरु केला आहे. नोकरभरतीच्या जाहिराती व अपडेट माहितीसाठी https://www.linkedin.com/in/maha-transco/ हा लिंक्डइन प्लॅटफॉर्मही सुरू केला आहे. वेबसाईटसह एक्स, फेसबुक, इन्स्टाग्राम, थ्रेडस, युट्यूब, टेलिग्राम चॅनेलसह सर्वाधिक सोशल मीडियावर असणारी महापारेषण ही पहिली कंपनी ठरली आहे. महापारेषणचा स्वतंत्र पॉडकास्ट चॅनेलही लवकरच सुरू होणार आहे.





**मुंबई :** महापारेषणने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त प्रकाशगडमध्ये आयोजिलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांसमवेत महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. कैलास कणसे, श्री. मंगेश शिंदे, श्री. राजू गायकवाड, श्री. भरत पाटील, श्री. नितीन कांबळे.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

# संस्कृती टिकविण्यासाठी मराठी भाषेचा प्रसार करा : श्री. सुगत गमरे

Follow us on :

``शासकीय कामकाजाबरोबरच दैनंदिन व्यवहारातही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मराठी भाषेचा जास्तीत-जास्त वापर करावा. तसेच मराठी संस्कृती टिकविण्यासाठी मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा``, असे मत महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी वांद्रे येथील प्रकाशगड इमारतीच्या सभागृहात आयोजिलेल्या अभिजात मराठी, अभिमान मराठी या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण समारंभात श्री. सुगत गमरे बोलत होते.

याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, मराठी भाषा समन्वय अधिकारी श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. अभय रोही उपस्थित होते.

श्री. सुगत गमरे पुढे म्हणाले, ``मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी दैनंदिन जीवनातही मराठीचा वापर करावा. मराठी भाषेच्या प्रसारासाठी महापारेषणने म्हणी स्पर्धा, चरित्रवाचन स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आयोजित केल्या, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. या सांस्कृतिक कलागुणांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना वाढीस लागते.`` यावेळी नाट्यअभिनेत्री श्रीमती मधुरा वेलणकर-साटम यांचा अस्सल मराठमोळा मधुरव (बोरू ते ब्लॉग) हा दर्जेदार कार्यक्रम घेण्यात आला.

प्रारंभी मराठी भाषा समन्वय अधिकारी तथा उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रितेश चौधरी व श्रीमती प्राजक्ता मदाने यांनी केले. श्री. महेश आंबेकर यांनी आभार मानले.



**मुंबई :** महापारेषणने वांद्रे येथे आयोजिलेल्या विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलताना महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. कैलास कणसे, श्री. मंगेश शिंदे.



**मुंबई** नाट्यअभिनेत्री श्रीमती मधुरा वेलणकर-साटम यांचा अस्सल मराठमोळा मधुरव (बोरू ते ब्लॉग) हा दर्जेदार कार्यक्रम घेण्यात आला.

### महापारेषणमध्ये नाविन्यपूर्ण संकल्पनांवर भर

महापारेषणमध्ये विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्यामध्ये संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे नेहमी अग्रेसर असतात. दरवर्षी मराठी भाषा दिनाला विविध कार्यक्रमांची रेलचेल असते. विशेषतः महापारेषणच्या वर्धापनदिन अनोख्या पध्दतीने करण्यावर श्री. गमरे यांचा विशेष भर असतो. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली व संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्या मार्गदर्शनाखाली महापारेषणने विविध पुरस्कार मिळविले आहेत.

### निकाल पुढीलप्रमाणे :

**मराठी म्हणी स्पर्धा :**
अनिक मांढरे (प्रथम), पराग पाटील (व्दितीय)

**चरित्र वाचन स्पर्धा :**
सीमा डुबेवार (प्रथम), रितेश चौधरी (व्दितीय)

**वादविवाद स्पर्धा :**
माहिती व तंत्रज्ञान विभाग (प्रथम), तांत्रिक विभाग-२ (व्दितीय)




**नाशिक :** महापारेषणच्या आंतरपरिमंडळीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धे कराड परिमंडळाच्या `पगला घोडा` नाटकाने व्दितीय क्रमांक पटकाविला. याप्रसंगी विजेत्यासमवेत महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर यांच्यासह सर्व मुख्य अभियंता व वरिष्ठ अधिकारी.

# आंतरपरिमंडळीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत पुणे परिमंडळाच्या `बरड` ची बाजी

## कराडचा `पगला घोडा` व्दितीय तर ऐरोलीचा तृतीय क्रमांक

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या आंतरपरिमंडळीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा `कलाकुंभ २०२४` मुख्य अभियंता अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ नाशिक कार्यालयाच्या यजमान पदाखाली महाकवी कालिदास कलामंदिर नाशिक येथे ६ ते ९ जानेवारी २०२५ दरम्यान उत्साहात संपन्न झाली. या नाट्यस्पर्धेत पुणे परिमंडळाच्या `बरड` नाटकाने प्रथम क्रमांक, कराड परिमंडळाच्या `पगला घोडा` नाटकाने व्दितीय तर ऐरोली येथील महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे `आय एम पुंगळ्या शारूक्या आगीमहुळ` या नाटकाने तृतीय क्रमांक पटकाविला.

चार दिवस चाललेल्या नाट्यस्पर्धेत महापारेषण कंपनीच्या परिमंडळ कार्यालयांमार्फत अधिकारी कर्मचाऱ्यांनी समाजातील विविध ज्वलंत विषय घेउन एकूण नऊ नाटके सादर केली. या नाटकांनी नाट्यरसिकांचे चांगलेच मनोरंजन केले.

उदघाटनानंतर प्रथम सत्रात नाट्यस्पर्धेची सुरुवात अमरावती परिमंडळाच्या `थलाई कुथल` या नाटकाने झाली. व्दितीय सत्रात ऐरोली येथील राज्य भार प्रेषण केंद्राने `आय एम पुंगळ्या शारूक्या आगीमहुळ` हे नाटक सादर केले. ७ जानेवारीला वाशी परिमंडळाने `पान्देगा`, छत्रपती संभाजीनगर परिमंडळाने `टेक अ चान्स` व कराड परिमंडळाने `पगला घोडा` ही नाटके सादर केली. नाट्यस्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी ८ जानेवारीला प्रथम सत्रात सांघिक कार्यालयाने `एकेक पान गळावया`, व्दितीय सत्रात नागपूर परिमंडळाने `व्हाईट पेपर` व तृतीय सत्रात पुणे परिमंडळाने `बरड` हे नाटक सादर केले.

नाट्यस्पर्धेच्या समारोपाच्या दिवशी ९



**नाशिक :** महापारेषणच्या आंतरपरिमंडळीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत ऐरोलीच्या महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या `आय एम पुंगळ्या शारूक्या आगीमहुळ` या नाटकाने तृतीय क्रमांक पटकाविला. याप्रसंगी विजेत्यासमवेत महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर यांच्यासह सर्व मुख्य अभियंता व वरिष्ठ अधिकारी.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in




**नाशिक :** महापारेषणच्या आंतरपरिमंडळीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत पुणे परिमंडळाच्या 'बरड' नाटकाने प्रथम क्रमांक पटकाविला. याप्रसंगी विजेत्यासमवेत महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर यांच्यासह सर्व मुख्य अभियंता व वरिष्ठ अधिकारी.

जानेवारीला नाशिक परिमंडळाने 'लिव इन' हे नाटक सादर केले. सर्व परिमंडळातर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या अभिनयाच्या बळावर नाटकांचे उत्कृष्ट सादरीकरण करून नाट्य रसिकांवर भुरळ पाडली.

नाट्यस्पर्धेच्या परीक्षकांची भूमिका मुंबई विद्यापीठाचे नाट्यविभागातील प्रा. डॉ. मंगेश बनसोड, श्रीमती मानिनी जाधव व श्री. भालचंद्र कुबल यांनी पार पाडली. श्री. बनसोड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सर्व नाट्यकर्मींचे अभिनंदन केले. तसेच त्यांना काही मोलाचे सल्ले देउन त्यांचे कौतुक केले.

बक्षीस वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द मराठी नाट्य, सिनेकलावंत श्री. कुशल बद्रिके उपस्थित होते. श्री. बद्रिके यांनी देखील त्यांच्या खास शैलीत प्रेक्षकांच्या प्रश्नांना मिश्किल उत्तरे देत काही गमतीचे किस्से सांगितले. बक्षीस वितरण कार्यक्रमापूर्वी 'उत्सव महाराष्ट्राचा' हा मनोरंजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

या नाट्यस्पर्धेचा उदघाटन सोहळा महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. उदघाटक राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीचे कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता तथा कार्याध्यक्ष श्री. संजीव भोळे, सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. महेंद्र वाळके, श्रीमती जुईली वाघ, छत्रपती संभाजीनगरचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री सतीश अणे, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत, कराड परिमंडळाच्या मुख्य अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, तसेच नाशिक परिमंडळाचे सर्व अधीक्षक अभियंता सर्वश्री प्रवीण भालेराव, संजय अत्राम, मनिष खत्री, अनिल भारसाकळे, प्रकाश लिमकर तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे व सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद घोलप यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षक अभियंता तथा नाट्यस्पर्धेचे सचिव श्री. प्रवीण भालेराव यांनी केले. सूत्रसंचालन कार्यकारी अभियंता श्री. किरण शिंपी व उपकार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्रीमती रिना पाटील यांनी केले.

या स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गगरे, कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा नाट्य स्पर्धेचे मुख्य समन्वयक अधिकारी श्री. भरत पाटील यांचे नाशिक परिमंडळाने विशेष आभार व्यक्त केले. ही नाट्यस्पर्धा यशस्वी पार पाडण्याकरिता मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक परिमंडळातील सर्व अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, सर्व तांत्रिक, मानव संसाधन, वित्त व लेखा विभागातील कर्मचारी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) या सर्वांनी परिश्रम घेत स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे यांनी आभार मानले.



**नाशिक :** महापारेषण कंपनीच्या आंतरपरिमंडळीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा 'कलाकुंभ २०२४' च्या निमित्ताने एकत्र आलेले वरिष्ठ अधिकारी वर्ग.

**महामानवाला विनम्र अभिवादन!**

## वरिष्ठ अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी अभिवादन





**मुंबई :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, शेजारी संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील व अन्य वरिष्ठ अधिकारी.

Follow us on :

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर व संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे मौलिक विचार याबाबत माहिती दिली.

याप्रसंगी संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे, श्री. सचिन खडगी, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, श्रीमती आरती रामटेके, श्री. महेश आंबेकर, सुशील घाडगे यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**महामानवाला अभिवादन!**

## महापरिनिर्वाणदिनी अनुयायांसाठी विविध मोफत सुविधा

# मागासवर्गीय कर्मचारी संघटनेतर्फे चैत्यभूमीवर मोफत पाणीवाटप

Follow us on :





**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, बॅकवर्ड क्लास सीनियर इंजिनिअर्स ॲन्ड ऑफिसर्स असोसिएशन व स्वतंत्र मजदूर युनियनतर्फे अनुयायांच्या आरोग्यासाठी मुखपट्टी, पिण्याचे पाणी, बिस्किटे व अल्पोपहारांचे मोफत वाटप करताना महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी ६ डिसेंबरला देश-विदेशातून लाखो अनुयायी दरवर्षी दादर चैत्यभूमी येथे बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येत असतात. अनुयायांसाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन गेल्या १५ वर्षांपासून अविरतपणे पिण्याचे पाणी व विविध मोफत सुविधा पुरवत महामानवास अनोख्या पध्दतीने अभिवादन करत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, बॅकवर्ड क्लास सीनियर इंजिनिअर्स ॲन्ड ऑफिसर्स असोसिएशन व स्वतंत्र मजदूर युनियनतर्फे अनुयायांसाठी मुखपट्टी, पिण्याचे पाणी, बिस्किटे व अल्पोपहारांचे मोफत वाटप छत्रपती शिवाजी पार्क मैदान, दादर येथे स्टॉल उभारून करण्यात आले.

सकाळी नऊ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, महाव्यवस्थापक श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्या हस्ते पाणी वाटपास सुरुवात झाली.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, मुख्य अभियंता (पारेषण) श्री. महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ तसेच मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष श्री. संजय मोरे, कोषाध्यक्ष श्री. जीवन गायकवाड, उपसरचिटणीस श्री. अश्वजित गायकवाड, उपाध्यक्ष श्री. शैलेश आडे यांनी विशेष सहभाग नोंदविला.

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून गेल्या पंधरा वर्षापासून सातत्याने सुरु असलेला बाटलीबंद शुध्द पिण्याचे पाणी, आरोग्यदायी मुखपट्टी व अल्पोपहार मोफत वितरणाचा हा स्तुत्य उपक्रम म्हणजे बंधुत्व जपणारा व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा ठरला आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष श्री. जयंत कांबळे, प्रकाशगंगा शाखेचे अध्यक्ष श्री. गौतम कांबळे, सचिव श्री. पंकज बोरकर, संघटक श्री. सुमेध कोसोदे, श्री. रविकिरण जांभरुनकर, श्री. रोहन मुडशिंगीकर, श्री. अनिल गायकवाड, श्री. आनंद गायकवाड, श्री. संतोष गवई, श्रीमती ममता कांठे, श्रीमती भारती कांबळे, श्रीमती विशाखा बोरकर, कुमारी अरिया बोरकर, श्री. निशांत कांबळे, श्री. संदीप धाबर्डे, ईश्वर भारती, श्री. सुशांत सावंत आदी पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in

## सावित्रीमाईंना अभिवादन!





**मुंबई :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे. दुसऱ्या छायाचित्रात बोलताना मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी. तिसऱ्या छायाचित्रात उपस्थित महिला अधिकारी.

### ▶ महिला अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महापारेषणमध्ये उत्साहात साजरी

Follow us on :



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. भूषण बल्लाळ, श्री. किशोर गरूड, श्रीमती जुईली वाघ, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता श्री. अमित नाईक, श्रीमती ज्योती चिमटे, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याविषयीची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती भारती कांबळे यांनी मानले.


आमच्याशी कनेक्टेड रहा

@maha_transco @maha_transco MahaTransco

MahaTransco Mahatranscoltd MahaTransco

HAPPY REPUBLIC DAY

# महापारेषणमध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच महापारेषणच्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांनी ध्वजवंदन केले. यावेळी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. पीयूष शर्मा, श्री. महेंद्र वाळके, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, उपमुख्य सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी श्री. किशोर पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता श्री. विशाल वाघचौरे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ध्वजवंदनप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग. तिसऱ्या छायाचित्रात दादरच्या शिवाजी पार्कवर झालेल्या चित्ररथाच्या सादरीकरणावेळी महापारेषणच्या (ऊर्जा विभाग) चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधले.




## ऊर्जा विभागाच्या चित्ररथाने वेधले लक्ष

दादरच्या शिवाजी पार्कवर झालेल्या चित्ररथाच्या सादरीकरणावेळी महापारेषणच्या (ऊर्जा विभाग) चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधले. विशेषतः मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०., पारेषणचे वहन, नविनीकरणीय ऊर्जा या थीमवर असलेल्या चित्ररथाने उपस्थितांची वाहवा मिळविली. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला व महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली हा चित्ररथ तयार करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील व शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव उपस्थित होते.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.